**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) मा.सचिव (गृह), गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना क्र.४०-३/२०२०-डीएम-आय (ए) दि.२४/०३/२०२०.
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना क्रमांक - No:DMU/२०२०/CR.९२/DisM-१/दि. २३.०३.२०२०, दि.२४.३.२०२० व दि.२५.३.२०२०

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.१८/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक ३१/०३/२०२०

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. त्या करीता पालघर जिल्हयातील कार्यक्षेत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) प्रमाणे मनाई आदेश पारित करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी, करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र.४ व ५ च्या अधिसुचनेव्दारे राज्यामध्ये लॉकडाऊन परिस्थिती लागू करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी करोना विषाणुच्या (कोव्हिड १९) प्रसारामुळे मानवी जीवन, आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे. तसेच सदर विषाणुची लागण एका संक्रमित रुग्णाकडून अन्य व्यक्तीस / इसमास त्याच्या संपर्कात आल्याने होण्याची शक्यता विचारात घेता, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामध्ये दि.०१/०४/२०२० रोजी १२.०१ ते दि.१४/०४/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत त्यांचे राहते घर/राहण्याचे ठिकाण सोडून कोणत्याही सार्वजनिक/खाजगी ठिकाणी, परीसरातील रस्ते, हमरस्ते, सार्वजनिक मार्ग या ठिकाणी प्रवेश करणे, फिरणे, उभे राहणे, ताटकळणे, भटकणे, वाहन चालविणे या व यासारख्या कृतींना मज्जाव करण्याकरीता मनाई आदेश लागू करीत आहे.

तथापी जिल्हयातील अत्यावश्यक व जीवनावश्यक सेवा पुरविणाऱ्या खालील आस्थापनांना यातून वगळण्यात आले आहे.

१. दुध, अन्न पुरवठा सेवा, अन्नधान्य, किराणा, चिकन, मटण, अंडी, मासे.
२. फळे व भाजीपाला.

३. पशु व पोल्ट्री खाद्य, मत्स्य खाद्य व कोलंबी खाद्य व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)

४. हॉस्पीटल, मेडीसीन व फार्मास्युटीकल्स संबंधित सेवा, वैद्यकीय साहित्य (Medical Equipment)

५. बँकींग व वित्तीय सेवा, विमान सेवा संबंधित सेवा.

६. दुरध्वनी व संचार सेवा.

७. बंदर संबंधित सेवा.

८. प्रसार माध्यमे संबंधित.

९. विज, पेट्रोलियम, ऑईल आणि एनर्जी संबंधित.

१०. पिण्याचे पाणी व पाणी पुरवठा.

११. कृषी निविष्ठा विक्री केंद्रे व त्याची वाहतूक (आवश्यक फलक लावून)

१२. वरील सर्व बाबींशी संबंधित वेअर हाऊसिंग, कोल्ड स्टोरेजे (शितगृह) वरील सर्व बाबींशी संबंधित पुरवठा साखळी (Supply Chain)

१३. वरील सर्व सेवांशी संबंधित IT Services (मर्यादित मनुष्यबळावर)

१४. वस्तू/माल व त्या संबंधित मनुष्यबळाची वाहतूक करणारी वाहने (आवश्यक फलक लावून)

१५. पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित वाहने (फक्त कर्तव्यार्थ)

१६. अग्निशमन सेवा, कायदा व सुव्यवस्था तसेच अत्यावश्यक सेवा व तातडीने रुग्णवाहतूक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफ (फक्त कर्तव्यार्थ)

१७. माझ्यावतीने व पोलीस अधीक्षक पालघर यांनी परवानगी /पासेस दिलेल्या व्यक्ती व वाहने.

१८. खाजगी सुरक्षा सेवा.

१९. टेलिकम्युनिकेशन, इंटरनेट सर्व्हिसेस, ब्रॉड कास्टींग आणि केबल सर्व्हिसेस.

२०. अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या आस्थापना.

२१. Production units, which require continuous process after obtaining required permission from the state government.

२२. पशु वैद्यकीय दवाखाने व संबंधित आस्थापना.

(टिप :- वर नमुद प्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीबाबतचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे रुग्णांनी सोबत बाळगणे आवश्यक असेल.)

सदरहू आदेश अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्था/ व्यक्ती यांना / त्यांचे वाहनांना लागू असणार नाही.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधिताविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.३१/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/--**

(डॉ.कैलास बा.शिंदे)

**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.